**लॉकडाऊन मधील कालावधीत राज्यातील मजुरांना त्यांच्या मुळगांवी जाण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस मार्फत मोफत प्रवास करण्याची सुविधा देण्याबाबत .....**

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वन विभाग**
**शासन निर्णय,क्रमांक: डीएमयु-२०२०/प्र.क्र.९२/आव्यप्र-१**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०९.०५. २०२०

**शासन निर्णय:**

लॉकडाऊनमुळे राज्यात अडकलेल्या मजुरांना/ विस्थापित कामगारांना, यात्रेकरु , विद्यार्थी व इतर व्यक्तींना राज्यातंर्गत व परराज्यातून राज्यात येऊ इच्छिणाऱ्या मजुरांना/ विस्थापित कामगारांना, यात्रेकरु , विद्यार्थी व इतर व्यक्तींना काही अटी व शर्तीवर प्रवास करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार राज्याच्या सीमेपर्यंत इतर राज्यातून आलेल्या व राज्यातंर्गत असलेल्या नागरिकांना त्यांच्या गावापर्यंत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस मार्फत मोफत पोहचविण्याची सुविधा देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

२. या निर्णयाची अंमलबजावणी खालील कार्यपध्दतीनुसार करण्यात यावी :

१) परराज्यातुन राज्याच्या सीमेपर्यंत आलेल्या राज्यातील नागरिकांना त्यांच्या गावापर्यंत पोहचविण्यासाठी सीमावर्ती जिल्हयाचे जिल्हाधीकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले संबंधित तालुक्यातील तहसिलदार यांनी प्रवास करणाऱ्या नागरिकांची यादी प्रमाणीत करून ती एस. टी. महामंडळाच्या आगार व्यवस्थापकाकडे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या एस. टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडे दयावी.

२) राज्यातंर्गत अडकून असलेल्या मजुरांना / विस्थापित कामगारांना, यात्रेकरु, विद्यार्थी व इतर व्यक्तींना राज्यातील त्यांच्या गावापर्यंत पोहचविण्यासाठी पोलीस आयुक्तालयाच्या बाबतीत संबंधीत पोलीस उपायुक्त व इतर क्षेत्रासाठी जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी हे समन्वय अधिकारी राहतील. समन्वय अधिकारी यांनी त्यांच्या क्षेत्रामध्ये अडकलेल्या व मुळ गावी जाण्यास इच्छूक असलेल्या मजुरांना / विस्थापित कामगारांना, यात्रेकरु, विद्यार्थी व इतर व्यक्तींच्या नावाची यादी प्रमाणीत करून एस.टी.महामंडळाच्या आगार व्यवस्थापकाकडे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या एस. टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडे दयावी.

३) वरील प्रमाणे यादी प्राप्त झाल्यानंतर संबंधीत आगार व्यवस्थापकानी त्वरीत एस.टी.उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner

४) एस.टी.महामंडळाच्या बसेस मार्फत प्रवास करताना प्रवासा दरम्यान विषाणुचा प्रसार होवू नये म्हणून Social Distancing, Sanitization, Mask इत्यादीबाबत आवश्यक असलेली संपूर्ण दक्षता घेण्यात यावी.

५) **वरील प्रमाणे प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास आगाऊ स्वरूपात एकूण रू. २१,००,००,०००/- (रूपये एकवीस कोटी फक्त)** इतका निधी मंजूर करून वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. हा निधी केवळ बस प्रवासापोटी होणाऱ्या खर्चासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे. या निधीमधून अन्य कोणत्याही बाबींबर खर्च करू नये.

६) उपरोक्त निधी कोषागारातून आहरित करून तो व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना अदा करण्यास विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना प्राधीकृत करण्यात येत आहे.

७) या योजनेखाली होणाऱ्या प्रवासाचा तपशील जसे बस क्रमांक, प्रवाशांची नावे व एकूण प्रवाशांची संख्या, वापरण्यात आलेल्या बसेसची संख्या, बसेसच्या फेऱ्या इत्यादी सविस्तर पणे ठेवण्यात यावा.

८) सदर निधी ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्याची दक्षता व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी घ्यावी.

९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी या संदर्भातील खर्चाचे लेखे स्वतंत्र ठेवावेत. त्यांनी या प्रकरणी झालेल्या खर्चाचा सविस्तर तपशील व उपयोगिता प्रमाणपत्र विभागीय आयुक्त, कोकण यांना सादर करावे. या सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे विभागीय आयुक्त, कोकण यांनी शासनास पाठवावीत.

१०) या योजनेखालील प्रवासाचा विहित कालावधी संपुष्टात आल्यानंतर निधी शिल्लक राहिल्यास, व्यवस्थापकीय संचालक यांनी धनादेशाव्दारे सदर निधी विभागीय आयुक्त, कोकण यांना परत करावा.

११) जिल्हाधिकारी, पोलिस आयुक्त यांच्याशी संबधित जिल्ह्याचे विभागीय नियंत्रक हे समन्वय साधतील व आवश्यकते प्रमाणे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस वेळेवर उपलब्ध करून देतील.

१२) संबधित जिल्हाधिकारी , पोलिस आयुक्त यांनी मानक कार्य प्रणाली (SOP) तयार करून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अधिकारी यांच्याशी समन्वय साधून बस सोडण्याची ठिकाणे निश्चित करावीत एकाच ठिकाणी गर्दी होणार नाही व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी.

१३) प्रवासासाठी वापण्यात येणाऱ्या सर्व बसेस या विना वातानाकूलीत (Non AC) वापरण्यात याव्यात व कमीत कमी बसेसचा वापर करून अधिकाधिक प्रवाशांची वाहतूक करण्याबाबतचे योग्य



Scanned with CamScanner

नियोजन व व्यवस्था व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई यांनी करावी व नियोजनाबाबतीत योग्य अशा सूचना /आदेश काढण्यात यावेत.

१४) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकृत ठिकाणीच पिण्याचे पाणी व नैसर्गिक विधी साठी वाहने थांबविण्याची दक्षता घ्यावी.

१५) ज्या मार्गावर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस धावणार आहेत त्या मार्गावर पायी चालनारे मजुर / विस्थापित कामगार, यात्रेकरु , विद्यार्थी व इतर व्यक्ती असतील तर बस मध्ये जागा उपलब्ध असल्यास चौकशी करून गाडी त्या मार्गाने जाणार असल्यास त्यांना त्यामार्गावर सुरक्षित स्थळी सोडण्याची दक्षता संबधित चालक व वाहक यांनी घेऊन त्याची एक वेगळी यादी तयार करून आगार व्यवस्थापकाकडे प्रवास संपल्यानंतर जमा करावी तसेच गाडीत जागा नसल्यास एखाद्या महामर्गावर, राज्य मार्गावर किंवा इतर रस्त्यावर मजुर / विस्थापित कामगार, यात्रेकरु , विद्यार्थी व इतर व्यक्ती पायी चाललेले असतील तर त्या मार्गावर मोकळ्या विशेष बसेस सोडून त्या मार्गावरील प्रवाशांना गाडीमध्ये बसून त्या मार्गावर सुरक्षित स्थळी सोडून त्याबाबतची एक वेगळी यादी तयार करून आगार व्यवस्थापकाकडे प्रवास संपल्यावर जमा करावी याबाबतचे निर्णय संबधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी घ्यावेत. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी योग्य ते आदेश काढुन दक्षता घ्यावी.

१६) सदर प्रवास करण्याची सुविधा दिनांक ९ मे २०२० ते १७ मे २०२० पर्यंत अंमलात राहील.

१७) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या नियमित सवलती देखील या प्रवासासाठी देण्यात याव्यात.

१८) सर्व विभागीय आयुक्त, पोलिस आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक, प्रादेशिक परिवहन अधिकारी व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी एकत्रित समन्वय साधून आढावा घेऊन सर्व प्रवासी वाहतूक सुरक्षित होईल याची दक्षता घ्यावी.

१९) या प्रयोजनासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६, प्रधान लेखाशीर्ष -२२४५-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ०२, पूर, चक्रीवादळे इत्यादी, ८०० इतर खर्च, (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च, (९२) (०१) इतर खर्च (दत्तमत) ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ २४०७) या लेखाशीर्षाखाली पुनर्विनियोजनेव्दारे उपलब्ध करून दिलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

(अजोय मेहता)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.



Scanned with CamScanner

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधान परिषद), विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय विधान सभा/विधान परिषद सदस्य.
५. मा.मंत्री / राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव.
६. अपर मुख्य सचिव ( वित्त ), मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव,सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,मंत्रालय,मुंबई,
८. सर्व विभागीय आयुक्त.
९. सर्व पोलीस आयुक्त/ पोलीस अधिक्षक.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई.
११. सर्व जिल्हाधिकारी.
१२. प्रादेशिक परिवहन अधिकारी व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी.
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
१४. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर.
१५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१६. अधीदान व लेखा अधीकारी, मुंबई.
१७. मा. मंत्री(मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
१८. मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
१९. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय, मुंबई.
२०. कार्यासन अधिकारी (म-११), मदत व पुनर्वसन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६), मंत्रालय, मुंबई.
२२. निवड नस्ती (कार्यासन- आव्यप्र-१).



Scanned with CamScanner